# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्त विभाग
# प्रादेशिक बातमीपत्र
# सकाळी 07 वाजून 10 मि

**दिनांकः02.07.2024** **वारः मंगळवार**

---

**ठळक बातम्या**

• तीन नव्या फौजदारी कायद्यांमुळे देशात सर्वात आधुनिक न्याय प्रणाली लागू होईल - केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांचा विश्वास

• स्पर्धा परिक्षांमधील गैरप्रकार रोखण्यासाठी या अधिवेशनातच विधेयक आणणार - उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

• विधान परिषदेच्या आगामी निवडणुकांसाठी भाजपा आणि कॉँग्रेसकडून उमेदवारांची घोषणा

आणि

• महिला क्रिकेटमध्ये, भारताची दक्षिण आफ्रिकेवर दहा खेळाडू राखून दणदणीत मात

**नवे कायदे**

भारतीय न्याय संहिता, भारतीय नागरिक सुरक्षा संहिता आणि भारतीय साक्ष्य अधिनियम हे तीन नवे कायदे कालपासून देशभरात लागू झाले आहेत. या नव्या फौजदारी कायद्यांमध्ये शिक्षेऐवजी न्यायाला प्राधान्य दिलं आहे, या कायद्यांमुळे देशात सर्वात आधुनिक न्याय प्रणाली लागू होईल असा विश्वास, केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांनी व्यक्त केला. ते म्हणाले -------

**संसद**

संसदेच्या दोन्ही सभागृहात काल राष्ट्रपतींच्या अभिभाषणावरील आभार दर्शक प्रस्तावावर चर्चा झाली. लोकसभेत विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांनी आपल्या भाषणात केलेल्या एका  वक्तव्यावरुन गदारोळ झाला. त्यांच्या विधानावर पंतप्रधान, गृहमंत्री आणि लोकसभा सभापतींनी आक्षेप घेतला. राहुल गांधी हिंदू धर्मीयांना सरसकटपणे हिंसक म्हणत असल्याचं सांगत, हे गंभीर असल्याचं पंतप्रधान म्हणाले. तर राहुल गांधी यांनी माफी मागावी अशी मागणी गृहमंत्री अमित शहा यांनी केली. संसद सदस्यांनी सभागृहाचं पावित्र्य राखावं असं सभापती ओम बिर्ला म्हणाले. त्यानंतर राहुल गांधी यांनी आपलं विधान विशिष्ट समुदायासाठी नसून ते भाजपासाठी होतं असं स्पष्टीकरण दिलं.

**विधी मंडळ**

स्पर्धा परिक्षांमधील गैरप्रकार रोखण्यासाठी सध्या सुरू असलेल्या पावसाळी अधिवेशनातच विधेयक आणणार असल्याचं आश्वासन उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी काल विधानसभेत दिलं. राज्यातल्या पेपर फुटीच्या संदर्भात विविध सदस्यांनी उपस्थित केलेल्या प्रश्नांना ते उत्तर देत होते. गट क श्रेणीतल्या पदांची भरती MPSC मार्फत होणार असून यासंदर्भात मंत्रिमंडळ निर्णय झाला असल्याचंही त्यांनी सांगितलं.महायुती सरकारच्या काळात भरती होणाऱ्या 1 लाख पदांपैकी  56 हजाराहून अधिक उमेदवारांना नियुक्तीपत्र दिली आहे. 20 हजार पदांच्या भरतीची सर्व प्रक्रिया झाली असून त्यांना लवकरच नियुक्ती पत्र दिली जातील, असंही फडणवीस म्हणाले. आणखी 31 हजारांहून अधिक पदांची भरती सुरू असल्याचही त्यांनी सांगितलं.अनुदानित शाळांमधील शिक्षकांना जुनी पेन्शन योजना लागू करण्यासाठी शिक्षक संघटनांशी बोलून त्यात यशस्वी मार्ग काढण्यात आला आहे, पुढील तीन महिन्यात त्यावर निर्णय घेतला जाईल अशी घोषणा उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी काल विधानसभेत प्रश्नोत्तराच्या तासात केली.

दरम्यान, महाराष्ट्र राज्य कौशल्य विद्यापीठ सुधारणा विधेयक विधानपरिषदेत मंजूर करण्यात आलं. आंतरराष्ट्रीय आणि आशियाई स्तरावर पुरस्कार पटकावणाऱ्या खेळाडूंना शासन सेवेत सामावून घेण्याबाबत मंत्रिमंडळाने एक सर्वसमावेशक धोरण ठरवलं असून या अधिवेशनात त्याबाबतचा शासन निर्णय आणला जाईल, अशी माहिती उच्च आणि तंत्रशिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील यांनी काल विधानपरिषदेत दिली. महात्मा ज्योतिबा फुले जन आरोग्य योजनेत दंतवैद्यकीय उपचारही समाविष्ट

करण्याची घोषणा सार्वजनिक आरोग्य आणि कुटुंबकल्याण मंत्री तानाजी सावंत यांनी विधान परिषदेत केली.

### विधान परिषद निकाल

विधान परिषदेच्या चार मतदारसंघातल्या निवडणुकीची मतमोजणी काल झाली. यात कोकण विभाग पदवीधर मतदारसंघातून भाजपाचे निरंजन डावखरे विजयी झाले. डावखरे सलग तिसऱ्यांदा या मतदारसंघातून निवडून आले आहेत. त्यांना पहिल्या पसंतीची 1 लाख 719 मतं मिळाली; तर काँग्रेसचे रमेश कीर यांना दुसऱ्या पसंतीची 28 हजार 585 मतं मिळाली. मुंबई पदवीधर मतदार संघातून शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे अनिल परब 44 हजार 784 मतांनी विजयी झाले.भारतीय जनता पार्टीचे किरण शेलार यांना 18 हजार 772 मतं मिळाली.मुंबई शिक्षक मतदार संघात शिवसेना उध्दव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे जगन्नाथ अभ्यंकर सर्वाधिक पसंती क्रमाची 4 हजार 83 मतं मिळवून विजयी झाले.नाशिक शिक्षक मतदार संघासाठीची मतमोजणी काल रात्री उशिरापर्यंत सुरू होती.

### उमेदवारी

राज्य विधान परिषदेच्या आगामी निवडणुकांसाठी भाजपाने पाच उमेदवारांची नावं काल जाहीर केली. यामध्ये पंकजा मुंडे, योगेश टिळेकर, परिणय फुके, अमित गोरखे, सदाभाऊ खोत यांचा समावेश आहे.तर काँग्रेसतर्फे प्रज्ञा सातव यांना उमेदवारी दिल्याचं महासचिव के. सी. वेणुगोपाल यांनी प्रसिद्धीपत्रकाद्वारे जाहीर केलं.

### वारी पुणे मुक्काम

संत श्री तुकाराम महाराज आणि संत श्री ज्ञानेश्वर महाराज यांचा पालखी सोहळा गेले दोन दिवस पुण्यात मुक्कामी होता. उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी काल पालखी विठ्ठल मंदिरातील श्री संत ज्ञानेश्वर महाराज यांच्या पादुकांचं तसंच निवडुंगा विठोबा मंदिरात जगद्गुरु तुकाराम महाराज पालखी

सोहळ्याचं दर्शन घेतलं.अत्यंत भक्तिमय वातावरणात पुणेकरांचा दोन दिवसांचा पाहुणचार घेऊन माऊली आणि तुकोबारायांचा पालखी सोहळा आज सकाळी आषाढी वारीसाठी पंढरपूरकडे मार्गस्थ होत आहे, ऐकुयात या विषयीचा अधिक वृत्तांत आमच्या प्रतिनिधीकडून....

**आषाढी वारीसाठी पंढरपूरकडे निघालेल्या संत श्री तुकाराम महाराज आणि संत श्री ज्ञानेश्वर महाराज यांच्या पालख्यांचा काल दिवसभर पुण्यात मुक्काम होता. पालख्यांच्या मुक्कामाच्या ठिकाणी म्हणजे नाना पेठ आणि भवानी पेठ याठिकाणी पुणेकर नागरिकांनी दर्शनासाठी काल पहाटेपासूनच लांबच लांब रांगा लावल्या होत्या. या परिसरातील खेळण्यांची आणि इतर आवश्यक वस्तूंच्या बाजारपेठेमुळे शहराच्या मध्यवस्तीला यात्रेचे स्वरूप आले होते. पुणे शहर आणि उपनगरात मंडळे आणि इतर सामाजिक संस्थांनी वारकऱ्यांच्या सेवार्थ अन्नदान, वैद्यकीय सेवा आणि पुणे शहर पर्यटन असे विविध उपक्रम राबवण्यात आले होते. शहरातील शनिवारवाडा, लाल महाल, पर्वती, दगडूशेठ गणपती मंदिर याठिकाणी वारकर्यांनी पर्यटनाचा आनंद घेतला. काहींनी उत्सुकता म्हणून मेट्रोची सफरही केली. काल रात्री उपनगरांत देखील अखंड हरिनामाचा गजर सुरु होता. एकूणच 2 दिवस पुणे शहर भक्तीमय झालं होते. आज पालख्या पुणेकरांचा पाहुणचार घेऊन पुढील मुक्कामासाठी रवाना होत असून संत ज्ञानेश्वर महाराज यांची पालखी अवघड दिवे घाटाचा टप्पा पार करणार आहे. आकाशवाणी बातम्यांसाठी संतोष गोगले, पुणे**

**कृषी दिन**

माजी मुख्यमंत्री दिवंगत वसंतराव नाईक यांच्या स्वप्नातील हरित महाराष्ट्र तयार करण्यासाठी राज्य शासन विविध उपाययोजना करत असून हरित आच्छादित महाराष्ट्र हीच वसंतराव नाईक यांना खरी श्रद्धांजली ठरेल, असं प्रतिपादन मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी काल मुंबईत केलं. माजी मुख्यमंत्री वसंतराव नाईक यांच्या जयंतीनिमित्त आयोजित कृषी दिन आणि वसंतराव नाईक कृषी पुरस्कार वितरण सोहळ्यात ते बोलत होते. राज्यात अनेक ठिकाणी काल कृषी दिनानिमित्त विविध उपक्रमांचं आयोजन करण्यात आलं होतं.

**मेधा पाटकर**

वीस वर्षांपूर्वी दाखल केलेल्या मानहानीच्या खटल्याप्रकरणी सामाजिक कार्यकर्त्या मेधा पाटकर यांना दिल्लीतल्या न्यायालयानं पाच महिन्यांचा कारावास ठोठावला आहे. दिल्लीचे सध्याचे नायब

राज्यपाल विनय कुमार सक्सेना यांनी हा खटला दाखल केला होता. मेधा पाटकर यांनी आपल्याबद्दल प्रसिद्धी पत्रकाद्वारे अपमानजनक मजकूर प्रसिद्ध केल्याचा आरोप करत सक्सेना यांनी 2001 मध्ये गुजरातमधल्या अहमदाबाद न्यायालयात याचिका दाखल केली होती. त्यानंतर हा खटला 2002 मध्ये दिल्ली न्यायालयात वर्ग करण्यात आला; याप्रकरणी 25  मे रोजी नवी दिल्लीतल्या दक्षिण जिल्हा न्यायालयानं पाटकर यांना दोषी ठरवलं होतं.

**पाऊस**

कोल्हापूर जिल्ह्यात दमदार पाऊस सुरू झाल्याने 60 टक्के क्षेत्रावर खरीपाची पेरणी झाली आहे. यंदा 10 ते 20 हजार हेक्टर पेरणी क्षेत्र वाढणार असल्याचा अंदाज आहे. धाराशिव जिल्ह्यातही खरिपाच्या 85 टक्के पेरण्या पूर्ण झाल्या आहेत. मांजरा आणि तेरणा या प्रमुख नद्यांचे पाणी पावसाळ्याच्या पहिल्याच महिन्यात भरून वाहू लागले आहे.

**दुध गंगा नदी**

वर्षा पर्यटनासाठी आलेले दोन तरुण काल कोल्हापुरमधल्या दुधगंगा नदीच्या पात्रात बुडाले. हे दोघे कर्नाटक मधल्या निपाणीचे असून, त्यापैकी एकजण  डोहात उतरल्यानंतर  पाण्याचा अंदाज न आल्याने डोहात बुडू लागला. त्याला वाचवण्यासाठी गेलेला दूसरा तरूणही पाण्याच्या प्रवाहात वाहून गेला. या दोघांचा शोध सुरू आहे.

**अपघात**

यवतमाळच्या नागपूर तुळजापूर राष्ट्रीय महामार्गावर कार आणि ट्रक यांच्यात झालेल्या अपघातात काल 4 जणांचा मृत्यू झाला; तर एक जण गंभीर जखमी आहे. हे सर्व प्रवासी पंजाब मधले आहेत.

**क्रिकेट**

महिला कसोटी क्रिकेटमध्ये भारतानं दक्षिण अफ्रिकेचा दहा खेळाडू राखून दणदणीत पराभव केला. चेन्नई इथं झालेल्या या सामन्यात भारतीय खेळाडूंनी केलेली चमकदार कामगिरी लक्षणीय ठरली. फॉलोऑनला सामोरं जावं लागलेल्या दक्षिण आफ्रिकेच्या संघानं दुसऱ्या डावात 373 धावा केल्या. त्यानंतर भारताने विजयासाठी आवश्यक 37 धावा दहाव्या षटकातच एकही खेळाडू न गमावता पूर्ण केल्या. सामन्यामध्ये दहा बळी घेणारी स्नेह राणा सर्वोत्तम खेळाडू ठरली. दोन्ही संघात झालेल्या मर्यादित षटकांच्या सामन्यातही भारताला निर्भेळ यश मिळालं होतं. आता या दोन संघांमध्ये 20 षटकांचे तीन सामने होणार आहेत, या मालिकेतला पहिला सामना येत्या 5 तारखेला चेन्नई इथं होणार आहे.

**हवामान आयएमडी**

येत्या 24 तासात राज्यात बहुतांश ठिकाणी पाऊस पडण्याची शक्यता आहे, या काळात कोकण आणि मध्य महाराष्ट्रात तुरळक ठिकाणी मुसळधार पावसाची शक्यता हवामान विभांगां वर्तवली आहे.

**आकाशवाणी पुणे केंद्रावरचं प्रादेशिक बातमीपत्र संपलं, नमस्कार.**